# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र ९६** **दिनांक- १४/०४/२०२१.**

**बँकेत पैसे काढण्यासाठी जाणाऱ्या ग्राहकांचे पैसे, हातचलाखीने दिशाभूल करून लुबाडणारा सराईत आरोपी गजाआड**

दि.१८/०२/२०२१ रोजी १४.०० वा चे सुमारास तक्रारदार हे बँक ऑफ इंडिया, शाखा-भाईंदर पुर्व येथे त्यांचे पेंशन खात्यातुन २०,०००/- रु. काढुन ते पैसे मोजत असतांना अनोळखी आरोपी याने तक्रारदार यांचाजवळ येऊन त्यांचे हातातील पैसे स्वतःचे हातात घेवुन "अंटी इसमे तीन नोट नकली है बदली करके लेलो" असे बोलुन पुन्हा पैसे तक्रारदार यांचे हातात दिले. त्यावेळी तक्रारदार या बँकेच्या काऊंटरवर नकली नोटा बाबत चौकशी करण्याकरीता गेल्या. त्यांनी पैसे मोजुन पाहिले असता त्यामध्ये ८,४००/-रु कमी असल्याचे आढळुन आले म्हणुन तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. I १०४/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करणेत आला होता.

वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचे तांत्रिक तपास व बातमीदारामार्फत माहिती प्राप्त केली असता आरोपी हा गाव-अंबीवली, ता-कल्याण, जि-ठाणे या भागातील राहणारा असुन त्याचे नाव आबीद ऊर्फ नेपाळी फिरोज इराणी असल्याचे समजले. त्याप्रमाणे सापळा रचुन त्यास ताब्यात घेवुन दाखल गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. तसेच सदर आरोपी हा नोटा मोजुन देतो असे सांगुन लोकांची दिशाभुल करुन चलाखीने लोकांना लुबाडण्याचे गुन्हे करण्यात सराईत आहे. सदर आरोपी याचा गुन्हे इतिहास तपासला असता सदर आरोपी याचावर खालीलप्रमाणे गुन्हे नोंद असल्याची माहिती मिळाली आहे.

**अटक आरोपीचा गुन्हे अभिलेख खालीलप्रमाणे-**

| अ.क्र | पोलीस ठाण्याचे नाव | गुन्हा रजि नंबर व कलम |
|---|---|---|
| १) | शिवाजी पार्क पोलीस ठाणे, मुंबई | १८७/२०१५ कलम-४२० भादवि |
| २) | शिवाजी पार्क पोलीस ठाणे, मुंबई | ३६/२०१५ कलम-४२०,३४ भादवि |
| ३) | दादर पोलीस ठाणे, मुंबई | ३२९/२०१४ कलम-३७९ भादवि |
| ४) | आग्रीपाडा पोलीस ठाणे, मुंबई | १३७/२०१७ कलम-४२०,३४ भादवि |
| ५) | आग्रीपाडा पोलीस ठाणे, मुंबई | ११८/२०१७ कलम-४२०,३४ भादवि |
| ६) | माटुंगा पोलीस ठाणे, मुंबई | २३७/२०१५ कलम-३९२,३४ भादवि |
| ७) | उल्हासनगर पोलीस ठाणे, ठाणे | १६१/२०१५ कलम-३९२,३४ भादवि |
| ८) | उल्हासनगर पोलीस ठाणे, ठाणे | १७५/२०१५ कलम-४२० भादवि |
| ९) | उल्हासनगर पोलीस ठाणे, ठाणे | १३४/२०१६ कलम-४२०,५११ भादवि |
| १०) | सेंट्रल पोलीस ठाणे, ठाणे | १३०५/२०१९ कलम-४२०,३४ भादवि |
| ११) | सेंट्रल पोलीस ठाणे, ठाणे | ४५८/२०१९ कलम-४२०,३४ भादवि |
| १२) | माणिकपुर पोलीस ठाणे, मि.भा-व.वि आयुक्तालय | ११४/२०१८ कलम-४२० भादवि |

Scanned with CamScanner

सदरची कामगिरी ही श्री अमित काळे, मा. पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१ ,श्री शशिकांत भोसले, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस ठाण्याचे वपोनि श्री मिलिंद देसाई, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि योगेश काळे, पोउनि संदिप ओहोळ तसेच सपोनि पुल्ली, सपोनि देवरे, पोउनि प्रमोद पाटील, पोना-१४१८/भालेराव, पोना-२१७१/महाकुलकर, पोशि-३३५९/शिंदे, पोशि-१६९४/माने, पोशि-२८३८/गिरगावकर, पोशि-३४५८/जाधव तसेच नयानगर पोलीस ठाण्याचे गुन्हे पथकाचे पोउनि सुपनार, पोउनि चव्हाण, पोहवा-११८६/पाटील, पोना-३७१/पठाण, पोना-३१४८/संधु यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि काळे करीत आहे.

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणीही बँकेमध्ये पैसे काढण्यासाठी गेले असता आपल्याकडील पैसे कोणत्याही अनोळखी इसमास मोजण्यासाठी, पाहण्यासाठी देवू नये व अशा कोणत्याही अमिषांना बळी पडू नये.

Scanned with CamScanner